# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**


No,CGRF/AZ/R/156/2008/77/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Ramesh Keshavrao Kale, Tq.Lasur Station Tq.Gangapur, Dist. Aurangabad. (Con. No. 508800311288).

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Ramesh Keshavrao Kale, Tq.Lasur Station Tq.Gangapur, Dist. Aurangabad.

The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of wrong reading .

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on 16.12.2008 at 12.30 Hours

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

**Copy to:-**

Shri Ramesh Keshavrao Kale,
At .Lasur Station
Tq.Gangapur,
Dist. Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/१५६/२००८/७७**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०१/११/२००८**
**निकाल दिनांक ;- ३०/१२/२००८**

**श्री रमेश केशवराव काळे,**
**मु.पोस्ट लासुरस्टेशन,**
**ता. गंगापूर जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.५०८८००३११२८८) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ग्रामीण मंडळ औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०१/११/२००८ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २६/११/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असून त्यांना जानेवारी २००८ मध्ये त्याना चुकीचा वीज बिलाची आकारणी करण्यात आली याबाबत त्यांनी केलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेता त्यांना सतत वाढीव रक्कमेची बिल आकारणी करण्यात आल्यामुळे अर्जदाराने मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक १६/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री काळे उपस्थित होते. महावितरणचे नोडल अधिकारी श्री जैस्वाल यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला अर्जदारास चुकीचे वीज बिल देण्यात आल्याचे मान्य करीत ते सुधारून देण्याची तयारी दर्शविली. त्याचप्रमाणे सुधारीत वीज बिलातुन व्याज व दंडाची रक्कम कमी करून ५०६९-३१/- रूपये ची रक्कम, मंचाने मान्यता दिल्यास कमी करण्यात येईल असे सांगितले.मंचाने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या वीज बिल रिव्हीजन प्रस्तावाचे अवलोकन केल्यावर ते योग्य असल्याचे दिसून आले. सुनावणी दरम्यान ही बिल रिव्हीजन अर्जदारास नोडल अधिकारी यांनी समजावुन सांगितले अर्जदाराने त्यावर आक्षेप नसल्याचे सांगत ते मान्य केले त्यामुळे अर्जदाराची तक्रारीचे निवारण झाले असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे मंचाने प्रकरण निकाली काढले.

# आदेश

१) दोन्ही पक्षात तडजोड झाल्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात आले.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/१५६/२००८/७७** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री रमेश केशवराव काळे,**
**मु.पोस्ट लासुरस्टेशन,**
**ता. गंगापूर जिल्हा औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१५६/२००८/७७ )

आपण दिनांक २६/११/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**